# Shri Venkatesh Stotra in Marathi:

श्री गणेशाय नमः |श्री व्यंकटेशाय नमः ||

ॐ नमो जी हेरंबा |सकळादि तू प्रारंभा |
आठवूनी तुझी स्वरूप शोभा |वंदन भावे करीतसे ||१ ||

नमन माझे हंसवाहिनी |वाग्वरदे विलासिनी |
ग्रंथ वदावया निरुपणी |भावार्थखाणी जयामाजी ||२ ||

नमन माझे गुरुवर्या |प्रकाशरूपा तू स्वामिया |
स्फूर्ति द्यावी ग्रंथ वदावया |जेणे श्रोतया सुख वाटे ||३ ||

नमन माझे संतसज्जना |आणि योगिया मुनिजना |
सकळ श्रोतया साधुजना |नमन माझे साष्टांगी ||४ ||

ग्रंथ ऐका प्रार्थनाशतक |महादोषांसी दाहक |
तोषुनिया वैकुंठनायक |मनोरथ पूर्ण करील ||५ ||

जयजयाजी व्यंकटरमणा |दयासागरा परिपूर्णा |
परंज्योती प्रकाशगहना |करितो प्रार्थना श्रवण कीजे ||६ ||

जननीपरी त्वां पाळिले |पितयापरी त्वां सांभाळिले |
सकळ संकटांपासुनि रक्षिले |पूर्ण दिधले प्रेमसुख ||७ ||

हे अलोलिक जरी मानावे |तरी जग हे सृजिले आघवे |
जनकजननीपण स्वभावें |सहज आले अंगासी ||८ ||

दीनानाथा प्रेमासाठी |भक्त रक्षिले संकटी |
प्रेम दिधले अपूर्व गोष्टी |भजनासाठी भक्तांच्या ||९ ||

आता परिसावी विज्ञापना |कृपाळुवा लक्ष्मीरमणा |
मज घालोनि गर्भाधाना |अलौकिक रचना दाखविली ||१० ||

तुज न जाणता झालो कष्टी |आता दृढ तुझे पायी घातली मिठी |
कृपाळुवा जगजेठी |अपराध पोटी घाली माझे ||११ ||

माझिया अपराधांच्या राशी |भेदोनी गेल्या गगनासी |
दयावंता हृषीकेशी |आपुल्या ब्रीदासी सत्य करी ||१२ ||

पुत्राचे सहस्र अपराध |माता काय मानी तयाचा खेद |
तेवी तू कृपाळू गोविंद |मायबाप मजलागी ||१३ ||

उडदांमाजी काळेगोरे |काय निवडावे निवडणारे |
कुचलिया वृक्षांची फळे |मधुर कोठोनी असतील ||१४ ||

अराटीलागी मृदुता |कोठोनी असेल कृपावंता |
पाषाणासी गुल्मलता |कैसियापरी फुटतील ||१५ ||

आपादमस्तकावरी अन्यायी |परी तुझे पदरी पडिलो पाही |
आता रक्षण नाना उपायी |करणे तुज उचित ||१६ ||

समर्थाचिये घरींचे श्र्वान |त्यासी सर्वही देती मान |
तैसा तुझा म्हणवितो दीन |हा अपमान कवणाचा ||१७ ||

लक्ष्मी तुझे पायांतळी | आम्ही भिक्षेसी घालोनी झोळी |
येणे तुझी ब्रीदावळी | कैसी राहील गोविंदा || १८ ||

कुबेर तुझा भांडारी | आम्हां फिरविसी दारोदारी |
यात पुरुषार्थ मुरारी | काय तुजला पै आला || १९ ||

द्रौपदीसी वस्त्रे अनंता | देत होतासी भाग्यवंता |
आम्हांलागी कृपणता | कोठोनी आणिली गोविंदा || २० ||

मावेची करुनी द्रौपदी सती | अन्ने पुरविली मध्यराती |
ऋषीश्र्वरांच्या बैसल्या पंक्ती | तृप्त केल्या क्षणमात्रे || २१ ||

अन्नासाठी दाही दिशा | आम्हां फिरविसी जगदीशा |
कृपाळुवा परमपुरुषा | करुणा कैसी तुज न ये || २२ ||

अंगीकारी या शिरोमणि | तुज प्रार्थितो मधुर वचनी |
अंगीकार केलिया झणी | मज हातींचे न सोडावे || २३ ||

समुद्रे अंगीकारीला वडवानळ | तेणे अंतरी होतसे विव्हळ |
ऐसे असोनी सर्वकाळ | अंतरी साठविला तयाने || २४ ||

कूर्मे पृथ्वीचा घेतला भार | तेणे सोडिला नाही बडिवार |
एवढा ब्रम्हांडगोळ थोर | त्याचा अंगीकार पै केला || २५ ||

शंकरे धरिले हाळाहळा | तेणे नीळवर्ण झाला गळा |
परी त्यागिले नाही गोपाळा | भक्तवत्सला गोविंदा || २६ ||

माझ्या अपराधांच्या परी | वर्णिता शिणली वैखरी |
दुष्ट पतीत दुराचारी | अधमाहूनि अधम || २७ ||

विषयासक्त मंदमति आळशी | कृपण कुव्यसनी मलिन मानसी |
सदा सर्वकाळ सज्जनांसी | द्रोह करी सर्वदा || २८ ||

वचनोक्ति नाही मधुर | अत्यंत जनांसी निष्ठुर |
सकळ पामरांमाजी पामर | व्यर्थ बडिवार जगी वाजे || २९ ||

काम क्रोध मद मत्सर | हे शरीर त्यांचे बिढार |
कामकल्पनेसी थार | दृढ येथे केला असे || ३० ||

अठरा भार वनस्पतींची लेखणी | समुद्र भरला मषीकरुनी |
माझे अवगुण लिहिता धरणी | तरी लिहिले न जाती || ३१ ||

ऐसा पतित मी खरा | परी तू पतितपावन शारंगधरा |
तुवा अंगीकार केलिया गदाधरा | कोण दोषगुण गणील || ३२ ||

नीचा रतली रायासी | तिसी कोण म्हणेल दासी |
लोह लागता परिसासी | पूर्वास्थिती मग कैंची || ३३ ||

गांवीचे होते लेंडवोहळ | गंगेसी मिळता गंगाजळ |
काकविष्ठेचे झाले पिंपळ | तयांसी निंद्य कोण म्हणे || ३४ ||

तैसा कुजाति मी अमंगळ | परी तुझा म्हणवितो केवळ |
कन्या देऊनिया कुळ | मग काय विचारावे || ३५ ||

जाणत असता अपराधी नर | तरी का केला अंगीकार |
अंगीकारावरी अव्हेर | समर्थे केला न पाहिजे || ३६ ||

धाव पाव रे गोविंदा | हाती घेवोनिया गदा |
करी माझ्या कर्माचा चेंदा | सच्चिदानंदा श्रीहरी || ३७ ||

तुझिया नामाची अपरिमित शक्ति | तेथें माझी पापे किती |
कृपाळुवा लक्ष्मीपती | बरवे चित्ती विचारी || ३८ ||

तुझे नाम पतितपावन | तुझे नाम कलिमलदहन |
तुझे नाम भवतारण | संकटनाशन नाम तुझे || ३९ ||

आता प्रार्थना ऐके कमळापती | तुझे नामी राहे माझी मती |
हेंचि मागतो पुढतपुढती | परंज्योती व्यंकटेशा || ४० ||

तू अनंत तुझी अनंत नामे | तयांमाजी अति सुगमे |
ती मी अल्पमति सप्रेमे | स्मरूनी प्रार्थना करीतसे || ४१ ||

श्रीव्यंकटेशा वासुदेवा | प्रद्युम्ना अनंता केशवा |
संकर्षणा श्रीधरा माधवा | नारायणा आदिमूर्ती || ४२ ||

पद्मनाभा दामोदरा | प्रकाशगहना परात्परा |
आदि अनादि विश्वंभरा | जगदुद्धारा जगदीशा || ४३ ||

कृष्णा विष्णो हृषीकेशा | अनिरुद्धा पुरुषोत्तमा परेशा |
नृसिंह वामन भार्गवेशा | बौद्ध कलंकी निजमूर्ती || ४४ ||

अनाथरक्षका आदिपुरुषा | पूर्णब्रम्ह सनातन निर्दोषा |
सकळमंगळ मंगळाधीशा | सज्जनजीवना सुखमूर्ते || ४५ ||

गुणातीता गुणज्ञा | निजबोधरूपा निमग्ना |
शुद्ध सात्विका सुज्ञा | गुणप्राज्ञा परमेश्वरा || ४६ ||

श्रीनिधी श्रीवत्सलांछनधरा | भयकृद्भयनाशना गिरीधरा |
दृष्टदैत्यसंहारकरा | वीरा सुखकरा तू एक || ४७ ||

निखिल निरंजन निर्विकारा | विवेकखाणीवैरागवरा |
मधुमुरदैत्यसंहारकरा | असुरमर्दना उग्रमूर्ती || ४८ ||

शंखचक्रगदाधरा | गरुडवाहना भक्तप्रियकरा |
गोपीमनरंजना सुखकरा | अखंडित स्वभावे || ४९ ||

नानानाटकसूत्रधारिया | जगद्व्यापका जगद्वर्या |
कृपासमुद्रा करुणालया | मुनिजनध्येया मूळमूर्ति || ५० ||

शेषशयना सार्वभौमा | वैकुंठवासिया निरुपमा |
भक्तकैवारिया गुणधामा | पाव आम्हां ये समयी || ५१ ||

ऐसी प्रार्थना करुनी देवीदास | अंतरी आठविला श्रीव्यंकटेश |
स्मरता हृदयी प्रकटला ईश | त्या सुखासी पार नाही || ५२ ||

हृदयी आविर्भवली मूर्ति | त्या सुखाची अलोलिक स्थिती |
आपुले आपण श्रीपती | वाचेहाती बोलवीतसे || ५३ ||

ते स्वरूप अत्यंत सुंदर | श्रोती श्रवण कीजे सादर |
सावळी तनु सुकुमार | कुंकुमाकार पादपद्मे || ५४ ||

सुरेख सरळ अंगोळिका | नखे जैसी चंद्ररेखा |
घोटीव सुनीळ अपूर्व देखा | इंद्रनिळाचियेपरी || ५५ ||

चरणी वाळे घागरिया | वांकी वरत्या गुजरिया |
सरळ सुंदर पोटरिया | कर्दळीस्तंभाचियेपरी || ५६ ||

गुडघे मांडिया जानुस्थळ | कटितटि किंकिणी विशाळ |
खालते विश्वउत्पत्तिस्थळ | वरी झळाळे सोनसळा || ५७ ||

कटीवरते नाभिस्थान | जेथोनि ब्रम्हा झाला उत्पन्न |
उदरी त्रिवळी शोभे गहन | त्रैलोक्य संपूर्ण जयामाजी || ५८ ||

वक्ष:स्थळी शोभे पदक | पाहोनी चंद्रमा अधोमुख |
वैजयंती करी लखलख | विद्युल्लतेचियेपरी || ५९ ||

हृदयी श्रीवत्सलांछन | भूषण मिरवी श्रीभगवान |
तयावरते कंठस्थान | जयासी मुनिजन अवलोकिती || ६० ||

उभय बाहुदंड सरळ | नखे चंद्रापरीस तेजाळ |
शोभती दोन्ही करकमळ | रातोत्पलाचियेपरी || ६१ ||

मनगटी विराजती कंकणे | बाहुवटी बाहुभूषणे |
कंठी लेइली आभरणे | सूर्यकिरणे उगवली || ६२ ||

कंठावरुते मुखकमळ |हनुवटी अत्यंत सुनीळ |
मुखचंद्रमा अति निर्मळ |भक्तस्नेहाळ गोविंदा ||६३ ||

दोन्ही अधरांमाजी दंतपंक्ती |जिव्हा जैसी लावण्यज्योती |
अधरामृतप्राप्तीची गती |ते सुख जाणे लक्ष्मी ||६४ ||

सरळ सुंदर नासिक |जेथे पवनासी झाले सुख |
गंडस्थळीचे तेज अधिक |लखलखीत दोहीं भागी ||६५ ||

त्रिभुवनीचे तेज एकटवले |बरवेपण सिगेसी आले |
दोन्ही पातयांनी धरिले |तेच नेत्र श्रीहरीचे ||६६ ||

व्यंकटा भृकुटिया सुनीळा |कर्णद्वयांची अभिनव लीळा |
कुंडलांच्या फाकती कळा |तो सुखसोहळा अलोलिक ||६७ ||

भाळ विशाळ सुरेख |वरती शोभे कस्तूरीटिळक |
केस कुरळे अलोलिक |मस्तकावरी शोभती ||६८ ||

मस्तकी मुगुट आणि किरीटी |सभोवती झिळमिळ्याची दाटी |
त्यावरी मयूरपिच्छांची वेटी |ऐसा जगजेठी देखिला ||६९ ||

ऐसा तू देवाधिदेव |गुणातीत वासुदेव |
माझिया भक्तिस्तव |सगुणरूप झालासी ||७० ||

आता करू तुझी पूजा |जगज्जीवना अधोक्षजा |
आर्ष भावार्थ हा माझा |तुज अर्पण केला असे ||७१ ||

करुनी पंचामृतस्नान | शुद्धामृत वरी घालून |
तुज करू मंगलस्नान | पुरुषसूक्ते करुनिया || ७२ ||

वस्त्रे आणि यज्ञोपवीत | तुजलागी करू प्रीत्यर्थ |
गंधाक्षता पुष्पे बहुत | तुजलागी समर्पू || ७३ ||

धूप दीप नैवेद्य | फल तांबूल दक्षिणा शुद्ध |
वस्त्रे भूषणे गोमेद | पद्मरागादिकरून || ७४ ||

भक्तवत्सला गोविंदा | ही पूजा अंगीकारावी परमानंदा |
नमस्कारुनी पादारविंदा | मग प्रदक्षिणा आरंभिली || ७५ ||

ऐसा षोडशोपचारे भगवंत | यथाविधी पूजिला हृदयात |
मग प्रार्थना आरंभिली बहुत | वरप्रसाद मागावया || ७६ ||

जयजयाजी श्रुतिशास्त्रआगमा | जयजयाजी गुणातीत परब्रम्हा |
जयजयाजी हृदयवासिया रामा | जगदुद्धारा जगद्गुरो || ७७ ||

जयजयाजी पंकजाक्षा | जयजयाजी कमळाधीशा |
जयजयाजी पूर्णपरेशा | अव्यक्तव्यक्ता सुखमूर्ती || ७८ ||

जयजयाजी भक्तरक्षका | जयजयाजी वैकुंठनायका |
जयजयाजी जगपालका | भक्तांसी सखा तू एक || ७९ ||

जयजयाजी निरंजना | जयजयाजी परात्परगहना |
जयजयाजी शुन्यातीत निर्गुणा | परिसावी विज्ञापना एक माझी || ८०
||

मजलागी देई ऐसा वर | जेणे घडेल परोपकार |
हेचि मागणे साचार | वारंवार प्रार्थितसे || ८१ ||

हा ग्रंथ जो पठण करी | त्यासी दु:ख नसावे संसारी |
पठणमात्रे चराचरी | विजयी करी जगाते || ८२ ||

लग्नार्थीयाचे व्हावे लग्न | धनार्थियासी व्हावे धन |
पुत्रार्थियाचे  मनोरथ पूर्ण | पुत्र देऊनी करावे || ८३ ||

पुत्र विजयी आणि पंडित | शतायुषी भाग्यवंत |
पितृसेवेसी अत्यंत रत | जयाचे चित्त सर्वकाळ || ८४ ||

उदार आणि सर्वज्ञ | पुत्र देई भक्तांलागून |
व्याधिष्ठाची पीडा हरण | तत्काळ कीजे गोविंदा || ८५ |

क्षय अपस्मार कुष्ठादिरोग | ग्रंथपठणे सरावा भोग |
योगाभ्यासियासी योग | पठणमात्रे साधावा || ८६ ||

दरिद्री व्हावा भाग्यवंत | शत्रूचा व्हावा नि:पात |
सभा व्हावी वश समस्त | ग्रंथपठणेकरुनिया || ८७ ||

विद्यार्थीयांसी विद्या व्हावी | युद्धी शस्त्रे न लागावी |
पठणे जगात कीर्ती व्हावी | साधु साधु म्हणोनिया || ८८ ||

अंती व्हावे मोक्षसाधन | ऐसे प्रार्थनेसी दीजे मन |
एवढे मागतो वरदान | कृपानिधे गोविंदा || ८९ ||

प्रसन्न झाला व्यंकटरमण | देवीदासासी दिधले वरदान |
ग्रंथाक्षरी माझे वचन | यथार्थ जाण निश्चयेसी || ९० ||

ग्रंथी धरोनी विश्वास | पठण करील रात्रंदिवस |
त्यालागी मी जगदीश | क्षण एक न विसंबे || ९१ ||

इच्छा धरुनी करील पठण | त्याचे सांगतो मी प्रमाण |
सर्व कामनेसी साधन | पठण एक मंडळ || ९२ ||

पुत्रार्थियाने तीन मास | धनार्थियाने एकवीस दिवस |
कन्यार्थियाने षण्मास | ग्रंथ आदरे वाचवा || ९३ ||

क्षय अपस्मार कुष्ठादिरोग | इत्यादि साधने प्रयोग |
त्यासी एक मंडळ सांग | पठणे करुनी कार्यसिद्धी || ९४ ||

हे वाक्य माझे नेमस्त | ऐसे बोलिला श्रीभगवंत |
साच न मानी जयाचे चित्त | त्यासी अध:पात सत्य होय || ९५ ||

विश्वास धरील ग्रंथपठणी | त्यासी कृपा करील चक्रपाणी |
वर दिधला कृपा करूनि | अनुभवे कळो येईल || ९६ ||

गजेंद्राचिया आकांतासी | कैसा पावला हृषीकेशी |
प्रल्हादाचिया भावार्थासी | स्तंभातूनि प्रकटला || ९७ ||

वज्रासाठी गोविंदा | गोवर्धन परमानंदा |
उचलोनिया स्वानंदकंदा | सुखी केलें तये वेळी || ९८ ||

वत्साचेपरी भक्तांसी | मोहे पान्हावे धेनु जैसी |
मातेच्या स्नेहतुलनेसी | त्याचपरी घडलेसे || ९९ ||

ऐसा तू माझा दातार | भक्तासी घालिसी कृपेची पाखर |
हा तयाचा निर्धार | अनाथनाथ नाम तुझे || १०० ||

श्री चैतन्यकृपा अलोकिक | तोषोनीया वैकुंठनायक |
वर दिधला अलोकिक | जेणे सुख सकळांसी || १०१ ||

हा ग्रंथ लिहिता गोविंद | या वचनी न धरावा भेद |
हृदयी वसे परमानंद | अनुभवसिद्‌ध सकळांसी || १०२ ||

या ग्रंथीचा इतिहास | भावे बोलिला विष्णुदास |
आणिक न लागती सायास | पठणमात्रे कार्यसिद्‌धी || १०३ ||

पार्वतीस उपदेशी कैलासनायक | पूर्णानंद प्रेमसुख |
त्याचा पार न जाणती ब्रम्हादिक | मुनि सुरवर विस्मित || १०४ ||

प्रत्यक्ष प्रकटेल वनमाळी | त्रैलोक्य भजत त्रिकाळी |
ध्याती योगी आणि चंद्रमौळी | शेषाद्रीपर्वती उभा असे || १०५ ||

देवीदास विनवी श्रोतया चतुरा | प्रार्थनाशतक पठण करा |
जावया मोक्षाचिया मंदिरा | काही न लागती सायास || १०६ ||

एकाग्रचित्ते एकांती | अनुष्ठान कीजे मध्यरात्री |
बैसोनिया स्वस्थचित्ती | प्रत्यक्ष मूर्ति प्रगटेल || १०७ ||

तेथे देहभावासी नुरे ठाव | अवघा चतुर्भुज देव |
त्याचे चरणी ठेवोनिया भाव | वरप्रसाद मागावा || १०८ ||

| इति श्री देवीदास विरचितं श्री व्यंकटेश स्तोत्रं संपूर्णम |

|| श्री व्यंकटेशार्पणमस्तु ||